**महापारेषण**

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
# अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, औरंगाबाद

## जाहिरात क्र. १ /२०१७

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या मुख्य अभियंता, अ.उ.दा. प्रकल्प नि संवसु परिमंडल, **औरंगाबाद** या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या अउदा प्रकल्प मंडल कार्यालयासाठी खाली नमुद केल्या प्रमाणे **वेतनगट - ३** मधील मंडल सेवाजेष्ठतेची **सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2)** ही रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरणे करीता अर्हता पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **ऑनलाईन अर्ज** मागविण्यात येत आहेत.

**२. भरावयाच्या पदांचा तपशिल:-**

| मंडल कार्यालयाचे नाव | मागासप्रवर्ग | | | खुला | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | अनु. जमाती | भ ज.(ब) | इमाव | | |
| अउदा प्रकल्प मंडल, औरंगाबाद | ०१ | ०१ | ०१ | ०३ (०१ महिला) | ०६ (०१ महिला) |
| **एकूण** | **०१** | **०१** | **०१** | **०३** | **०६** |

**टिप :-** जाहिरातीत दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होवू शकते. तसेच आरक्षणातही बदल होवू शकतो. प्रशासनाच्या निकडीनुसार असा बदल करण्याचे अधिकार कंपनीस असून सदर बदलाबाबत जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने अथवा उमेदवारास व्यक्तीशः वेगळा खुलासा करण्यात येणार नाही.

**३. वेतनश्रेणी:-** रूपये ११६२५-३७०-१३४७५-४१०-१७५७५-४५०-३१९७५

टिप :- कंपनीच्या नियमाप्रमाणे इतर भत्ते लागू राहतील.

**४. शैक्षणिक अर्हता व अनुभव (दि. ०६.०७.२०१७ पर्यंत):-**

४.१

| शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|
| शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले **सर्वेक्षण (Surveyor)** या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारक.<br>**किंवा**<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून **सर्वेक्षण (Surveyor)** व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले **सर्वेक्षण (Surveyor)** या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र धारक. | सर्वेक्षण (Surveyor) या क्षेत्रातील २ वर्षाचा कामाचा अनुभव |

४.२ उमेदवाराने दिनांक **०६.०७.२०१७** रोजी वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणे आवश्यक आहे.

**५. वयोमर्यादा:-**

५.१ दिनांक **०६.०७.२०१७** रोजी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल ३८ वर्षां पेक्षा जास्त नसावे.

५.२ कमाल वयोमर्यादा खालील बाबतीत शिथीलक्षम राहील.
१. शासनाच्या नियमाप्रमाणे मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथीलक्षम राहील.
२. महापारेषण कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ५७ वर्षे राहील.

५.३ वयाच्या पुराव्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (एस.एस.सी.) प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी प्रमाणपत्रावर नोंदविलेली / दर्शविलेली जन्मतारीख ग्राहय धरण्यात येईल.

## ६. सामाजिक व समांतर आरक्षणाबाबत:-

६.१ सामाजिक आरक्षण (मागास प्रवर्ग):-

१. जातीच्या दाव्याच्या पुष्ठर्थ मागास प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध असल्यास जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **'जाती वैधता प्रमाणपत्र'** सादर करणे आवश्यक राहील. तथापि, ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्याची नियुक्ती महाराष्ट्र शासन निर्णय क्र. **बीसीसी-२००९ / प्र.क्र.२९१ /०९/१६-ब दि. ०५.११.२००९ सह वाचावे शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११ / प्र.क्र.१०६४/२०११/१६ब दि. १२.१२.२०११** च्या तरतुदी नुसार करण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमांनुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागास प्रवर्गातील म्हणजे विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांना उन्नत/ प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्यामुळे या प्रवर्गातील उमेदवाराने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले **चालू वर्षाकरीता वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र** कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

३. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवारास महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. उमेदवाराने अर्जामध्ये जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. एकदा अर्जात दर्शविलेल्या जाती संबंधीचा पर्याय / प्रवर्ग बदलता येणार नाही.

५. मागासवर्गीय उमेदवारांची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्यांनी वयोमर्यादेत व परिक्षा शुल्कात सवलत घेतली असली तरी त्यांची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

६. खुल्या प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारास खुल्या प्रावार्गासाठीच ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, महापारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्याची म.रा.वि.मंडळ/ महापारेषण कंपनीतील नियुक्ती ही सामाजिक आरक्षणाचा लाभ (Caste Reservation Benefit) घेवून झालेली असल्यास अशा कर्मचाऱ्याने या जाहिरातीसाठी खुल्या प्रवर्गातून अर्ज केला असला तरी त्यास नियुक्तीपूर्वी सक्षम प्रधिकाऱ्याने जारी केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

६.२ समांतर आरक्षण :-

१. महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या महिला उमेदवारांनी अर्जातील संबंधित रकान्यात तसा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

२. महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले **चालू वर्षाकरीता वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र** कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

६.३ प्रमाणपत्र व दाव्याची वैधता :-

१. सामाजिक व समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवाराने तसे अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जामध्ये केलेला दावा बदलता येणार नाही.

२. सामाजिक व समांतर आरक्षणाचा संदर्भात आवश्यक असलेली कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापर्यंत धारण केलेली व प्राप्त केलेली असावीत.त्यानंतर धारण केलेली व प्राप्त केलेली कागदपत्रे पात्रता ठरविण्याकरिता विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**७. परिक्षा शुल्क:-**

७.१ परिक्षा शुल्काची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | **मागासवर्गीय उमेदवारासाठी** |
|---|---|
| रुपये ५००/- | रुपये २५०/- |

७.२ उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यापूर्वी व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यापूर्वी आपण सदर पदासाठी पात्र आहोत याची खात्री करावी व नंतरच अर्ज व परीक्षा शुल्क भरावे.

७.३ परीक्षा शुल्क इंटरनेट बँकिग किंवा क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड (RuPay / Visa / MasterCard / Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्डस किंवा Mobile Wallets द्वारे भरता येईल.

७.४ परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दती व्यतीरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने स्विकारले जाणार नाही.

७.५ विहीत शुल्कापेक्षा कमी शुल्क भरल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

७.६ सदर परिक्षा शुल्क हे **"ना परतावा"** राहील व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

७.७ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरताना उमेदवारास वर दर्शविलेल्या शुल्का बरोबरच बँकेच्या नियमाप्रमाणे बँक चार्जेस भरावे लागतील (परिक्षा शुल्क + बँक चार्जेस).

**८. परिक्षा केंद्र :-**

८.१ ऑनलाईन परिक्षेकरीता निश्चित केलेली परिक्षा केंद्र खालील प्रमाणे असतील.

**अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, धूळे, जळगाव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे, रत्नागिरी, सांगली, सातारा.**

८.२ उमेदवारास तीन परिक्षा केंद्रांचा पर्याय त्याच्या सोईकरता /अग्रक्रमाने उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने उमेदवाराने प्राधान्यक्रमाने तीन परिक्षा केंद्रांची नावे ऑनलाईन अर्जात नमूद करावी.

८.३ उमेदवाराने नमूद केलेल्या तीन केंद्रांपैकी एक केंद्र परिक्षेसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, त्या केंद्रास आवश्यक असलेल्या उमेदवारांची नोंदणी न झाल्यास त्या केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार नाही. त्यामुळे सदर उमेदवारांना उपलब्धतेनुसार नजीकच्या परिक्षा केंद्रावर वर्ग करण्यात येईल.

८.४ उमेदवाराने निवड केलेल्या केंद्रांवर त्या केंद्राच्या क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्यास उमेदवारास नजीकच्या उपलब्ध केंद्रावर वर्ग करण्यात येईल.

८.५ महापारेषण कंपनी, कोणतेही परिक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परिक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.

८.६ महापारेषण कंपनी, उमेदवाराने मागितलेल्या परिक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.

८.७ उमेदवार परिक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वतःच्या जोखीमवर व स्वतः च्या खर्चाने परिक्षेसाठी उपस्थित राहून परिक्षा देईल आणि यासाठी उमेदवारास कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास महापारेषण कंपनी त्यास जबाबदार राहणार नाही.

८.८ परिक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

**९. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत:-**

९.१ फक्त ऑनलाईन पध्दतीने कंपनीच्या संकेतस्थळावर भरलेले अर्ज स्विकारले व विचारात घेतले जातील.

९.२ या जाहिरातीच्या शेवटी ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता दिलेल्या लिंकवर उमेदवाराने Click करावे व **"New Registration"** यावर Click करुन अर्ज भरावा

९.३ ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणीक अर्हता, वय, प्रमाणपत्र वगैरे बाबी तसेच अटी, शर्ती व इतर बाबी काळजीपूर्वक वाचाव्यात व जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आपण सदर पदासाठी पात्र आहोत का ? याची खात्री करावी.

१.४ **वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, मागास प्रवर्ग, महिला इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. तसेच, अर्जामध्ये केलेला दावा बदलता येणार नाही.**

१.५ महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, डिसलेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्यात येईल. याबाबत अशा उमेदवारांनी अर्जामध्ये संबंधित रकान्यात योग्य माहिती भरावी.

१.६ महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, डिसलेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्यात येईल. याबाबत अशा उमेदवारांनी अर्जामध्ये संबंधित रकान्यात योग्य माहिती भरावी.

१.७ उमेदवारांनी ऑनलाईन सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात प्रवर्ग, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र, इत्यादी बाबी सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड जरी झाली तरी ती रद्द करण्यात येईल.

१.८ ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने प्रथम ज्या परिमंडलात अर्ज करावयाचा आहे त्या परिमंडलाचे नाव काळजीपूर्वक निवडावे व तदनंतर पूढील अर्ज भरावा.

१.९ परिमंडलाचे नाव निवडल्यानंतर उमेवाराने जात प्रवर्ग, आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे किंवा कसे, महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, परिक्षा केंद्र, नाव, जन्मतारीख, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरुन Submit Option वर Click करुन रजिस्ट्रेशन करावे.

१.१० रजिस्ट्रेशन करताना उमेदवाराने नोंदविलेल्या ईमेल पत्ता (Email Address) व भ्रमणध्वणी क्रमांकावर पुढील प्रक्रियेकरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड देण्यात येईल. उमेदवाराने सदर रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड याची नोंद आपल्याकडे काळजीपुर्वक करुन ठेवावी. रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारास ई-मेलव्दारे प्राप्त होईल.

१.११ भरती प्रक्रियेबाबतच्या पुढील सुचना उमेदवाराने ऑनलाईन अर्जात दिलेल्या ईमेल पत्त्यावर (Email Address) व भ्रमणध्वणी क्रमांकावर देण्यात येणार असल्याने उमेदवाराने आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल ही भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वापरात ठेवण्याची खबरदारी घ्यावी. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल भरती प्रक्रिया पुर्ण होण्या अगोदर बंद झाल्यास व त्यास ईमेल / संदेश प्राप्त न झाल्यास व त्यामुळे तो / ती परिक्षेस बसू शकला/शकली नाही अथवा निवड झाल्यावर रुजू होवू शकला/शकली नाही तर त्यास कंपनी जबाबदार रहाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१.१२ एकदा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर उमेदवारास पूढील माहिती काही कारणास्तव नंतर भरावयाची असल्यास अथवा ऑनलाईन परिक्षा शुल्क नंतर भरावयाचे असल्यास त्याला देण्यात आलेला रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड व्दारे तो नंतर Login करुन माहिती भरु शकतो / परिक्षा शुल्क भरु शकतो. मात्र सदर माहिती, शुल्क इत्यादी त्यास ऑनलाईन अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत भरावी लागेल. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत भरता येणार नाही.

१.१३ ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास त्या संबंधीची अडचण recruitment_helpdesk@mahatransco.in या ई-मेल पत्त्यावर नोंदवावी /पाठवावी. तांत्रिक अडचणींकरीता **०२२-२६५९५२२८** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१.१४ **उमेदवाराचे छायाचित्र, स्वाक्षरी स्कॅन करुन अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे बंधनकारक आहे. त्यासाठी उमेदवाराने खालील सूचनांचे पालन करावे:**

**१. फोटो /छायाचित्र स्कॅन:-**

स्वतःचा अलिकडच्या काळातील छायाचित्र/फोटो (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ से.मी.) स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त फोटो स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. फोटोची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेटमध्ये संगणकावर स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटोची संपूर्ण इमेज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

२. **स्वाक्षरी स्कॅन**

स्वतःची अलिकडच्या काळातील स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकारामध्ये काळ्या शाईच्या पेनने चौकोनात स्वाक्षरी करावी. फक्त स्वाक्षरी स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. स्वाक्षरीची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेटमध्ये संगणकावर स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. स्वाक्षरीची संपूर्ण इमेज २० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

९.१५ स्कॅनिंग संदर्भात अधिक माहितीसाठी उमेदवारांनी जाहिरातीसोबत जोडलेले परिशिष्ट-अ पहावे.

९.१६ प्रत्येक उमेदवाराने वरिल प्रमाणे फोटो, स्वाक्षरी (सही) त्या त्या ठिकाणी अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवाराने फोटो, स्वाक्षरी (सही) स्कॅन करताना ती स्वच्छ व ओळखता येण्याजोगी असल्याची खात्री करुन घ्यावी. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९.१७ सुस्पष्ट स्वाक्षरी अथवा फोटो अपलोड न केलेले / कोणत्याही प्रकारे अपूर्ण असलेला अर्ज भरती प्रक्रिये करीता विचारात घेतला जाणार नाही.

९.१८ अर्जात नमुद केलेली माहिती उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने इंग्रजी भाषेतून भरावी लागेल. पूर्ण माहिती भरल्यानंतर भरलेली माहिती बरोबर आहे का याची उमेदवाराने खात्री करावी. उमेदवारास ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीत Submit Option वर क्लिक करण्यापूर्वी बदल करावयाचा असल्यास अर्जदार Modify बटनावर क्लिक करुन अर्जात आवश्यक बदल करु शकतो.

९.१९ त्यानंतर संगणकावरील Submit Option क्लिक केल्यानंतर आपला अर्ज स्विकारला जाईल.

९.२० उमेदवाराने संगणकावर Submit Option क्लिक करण्यापूर्वी ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी कारण Submit Option क्लिक केल्यानंतर अर्जात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी

९.२१ उमेदवार जो पर्यंत संगणकावरील Submit Option क्लिक करुन अर्ज सादर करत नाही तोपर्यंत उमेदवाराचा अर्ज स्विकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारास रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड देण्यात आला असला तरी उमेदवाराचा अर्ज स्विकारला गेला असे होणार नाही. याबाबत उमेदवारांनी व्यक्तीशः खात्री करावी.

९.२२ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर त्याची एक प्रत (Printout) काढून माहितीस्तव स्वतःजवळ जतन करुन ठेवावी. ऑनलाईन अर्जाची प्रत अथवा इतर कोणतीही कागदपत्रे या कार्यालयास पाठवण्याची आवश्यकता नाही.

९.२३ उमेदवारांने एकापेक्षा जास्त वेळेस अर्ज सादर केला असल्यास अशा उमेदवाराचा शेवटचा अर्ज व त्यामधील माहिती ग्राहय धरण्यात येऊन अगोदरचा अर्ज व त्यामधील माहिती रद्दबातल ठरविण्यात येतील.

९.२४ **सदर पदाकरीता देण्यात आलेली जाहिरात ही महापारेषण कंपनीच्या अन्य परिमंडलांकडून देखील निर्गमित केली आहे. सर्व परिमंडलांच्या जाहिरातींच्या अनुषंगाने लेखी परिक्षा एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. त्यामुळे अर्जदाराने जरी एका परिमंडलापेक्षा जास्त परिमंडलाच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केला असला तरी अर्जदार ज्या परिमंडल कार्यालयाच्या नोंदणी क्रमांकानुसार / परीक्षा क्रमांकानुसार लेखी परिक्षेस हजर राहील त्याच परिमंडलासाठी त्याचा अर्ज ग्राह्य धरला जाईल.**

९.२५ ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहता उमेदवाराने आपला अर्ज शक्यतो वेळेआधीच भरावा जेणेकरुन इंटरनेट बंद पडणे किंवा इतर समस्यांमुळे अर्ज भरण्यास येणाऱ्या अडचणी उद्भवणार नाही.

९.२६ ऑनलाईन परीक्षेसंबंधीची माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवाराला त्याचे ऑनलाईन परीक्षेचे पत्र हे कंपनीच्या संकेतस्थळावरुन त्याच्या रजिस्ट्रेशन नंबरची व पासवर्डची नोंद करुन डाऊनलोड करता येईल/ प्रिंट काढता येईल. लेखी परीक्षेचे पत्र उमेदवारास कंपनीच्या संकेतस्थळावरुनच डाऊनलोड करावे लागेल / प्रिंट काढावी लागेल. लेखी परीक्षेचे पत्र (Call letter) पोस्टाने / कुरीअर मार्फत पाठविले जाणार नाही. प्रत्येक उमेदवारास ऑनलाईन परिक्षेस हजर राहताना लेखी परीक्षेचे पत्र (Call letter) सादर करणे अनिवार्य राहिल.

**१०. ऑनलाईन परीक्षेस हजर राहण्यासंबंधिच्या सूचनाः-**

१०.१ ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१. ऑनलाईन परीक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रवेश पत्र (Call Letter).

**प्रवेशपत्र डाऊनलोड करणे**

ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिता उमेदवांरांनी महापारेषण कंपनी वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल / एस.एम.एस द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित Link वर Click केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिताची Window स्क्रिनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड / जन्म तारखेचा वापर करावा. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

२. खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची **मूळ (Original)** व एक छायाप्रत सादर करावी. **ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत छायाप्रत Colour Xerox ग्राह्य धरली जाणार नाही.**

**ओळखपत्र**

'पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार कॉंसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)'

३. महिला उमेदवारांचे प्रवेश पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावांत विवाहनंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवांरानी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र / प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परिक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परिक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्रांशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१०.३ ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

१०.४ परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने प्रवेश पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

१०.५ परिक्षा केद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारांच्या प्रवेश पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वतःची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०.६ **निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणुक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाहीः**

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये.

**परीक्षेच्या वेळात किंवा एकुणच निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार,**

अनुचित प्रकार करणे

किंवा

तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे

किंवा

परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणुक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्‌धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा जतन करणे

किंवा

स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे.

किंवा

स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठींबा मिळविणे

किंवा

दळणवळणासाठी भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे

अशा कृत्यामध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.

**११. निवड पध्दती:**

११.१ सदर पदाकरता लेखी परिक्षा ही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल.

११.२ ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन लेखी परिक्षेस बोलविण्यात येईल.

११.३ ऑनलाईन लेखी परीक्षेसाठी उमेदवारांना बोलविण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची पडताळणी केली जाणार नाही. त्यामुळे लेखी परीक्षेला बोलविले म्हणजे उमेदवार त्या पदासाठी पात्र आहे असे होणार नाही. उमेदवाराची निवड ही त्याच्या पात्रतेसंबंधीच्या सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करूनच केली जाईल. त्यामूळे उमेदवाराने परिक्षा दिली म्हणून व लेखी परिक्षेत गुण मिळाले म्हणून निवड करण्यासाठी उमेदवाराचा हक्क राहणार नाही.

११.४ अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तूनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा ही पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता, बुध्दीमत्ता चाचणी व मराठी ज्ञानावर आधारित राहील.

११.५ उमेदवाराने दिलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांना शास्ती /दंड (Penalty) असेल त्यानुसार त्या प्रश्नास विहित असलेल्या एकुण गुणांच्या १/४ (०.२५%) इतके गुण दंड म्हणून प्राप्त गुणांमधून वजा करण्यात येऊन त्यानंतर अंतिम गुण काढण्यात येतील. तथापि, उमेदवाराने एखादया प्रश्नाचे उत्तर न दिल्यास / रिक्त ठेवल्यास अशा प्रश्नांना शास्ती /दंड (Penalty) लागणार नाही.

११.६ ऑनलाईन / लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल, त्यासाठी मुलाखती घेण्यात येणार नाहीत. तथापि, भरती प्रक्रिया व निवड करण्याची पध्दत व परिक्षा कधी व कुठे घ्यायची याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम असेल.

११.७ निवडसूची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रित मिळविलेले गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात येईल.

**१२. भरती प्रक्रियेचा कार्यक्रमः-**

| | | |
|---|---|---|
| १) | अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक.१६.०६.२०१७ पासून दिनांक ०६.०७.२०१७ पर्यंत. (रात्री ११.५९ मिनीटांपर्यत) |
| २) | लेखी परीक्षेचा अंदाजित महिना | *ऑगस्ट २०१७ |

* लेखी परीक्षेचा महिना अंदाजित असून त्याबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

**१३. सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१३.१ या जाहिरातीला अनुसरुन पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील. अन्य पध्दतीने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१३.२ जाहिरातीत नमुद केलेल्या पदासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने विहित शैक्षणिक अर्हता, वय, प्रमाणपत्रे वगैरे बाबी धारण केलेल्या आहेत याची खात्री करुनच अर्ज करावा.

१३.३ जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही '**किमान**' अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

**१३.४ <u>उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.</u>** त्यासाठी शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उमेदवाराने धारण व प्राप्त केलेले असावे.

१३.५ उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे एक आवश्यक बाब म्हणून **'लहान कुटुंब'** असल्याचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

१३.६ उमेदवाराने जर रोजगार व स्वयंरोजगार केंद्र येथे नाव नोंदविले असल्यास त्यांनी ऑनलाईन अर्जात नोंदणी क्रमांक नमूद करावा.

१३.७ उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबत खालील प्रमाणे प्रमाणपत्र धारण व प्राप्त केलेले असावे:

माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र अथवा मान्यता प्राप्त विद्यापिठातील / दहावी किंवा त्यावरिल परिक्षा मराठी विषयासह उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र.

**किंवा**

उमेदवारास मराठी भाषा लिहीता व वाचता येत असल्याबद्दलचे मान्यताप्राप्त विद्यापिठ / संस्थाकडील मराठी भाषेच्या प्राध्यापकाच्या स्वाक्षरीचे व त्यावर सदर विद्यापीठ/संस्थेच्या प्राचार्यांची प्रतिस्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र.

१३.८ निवड झालेल्या उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे अपेक्षीत आहे. परंतू मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या उमेदवारास सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून ३ वर्षांच्या आत महापारेषण कंपनीद्वारे घेण्यात येणारी मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

१३.९ उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरिता स्वखर्चाने यावे लागेल. याकरीता कोणत्याही प्रकारच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

१३.१० सदर पदाच्या निवड प्रक्रियेत ऑनलाईन परिक्षा कालावधीत, परिक्षेस विलंब होणे, परिक्षा पुर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परिक्षा वेळेवर पार पाडण्याचे/परिक्षा पुन्हा सुरु करण्याचे /निवड प्रक्रिया पुर्ण करण्याचे शक्यते सर्व प्रयत्न कंपनीतर्फे करण्यात येतील. तथापि आवश्यकता भासल्यास पुन्हा परिक्षा देखील घेतली जावू शकते. याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील. कंपनीचा निर्णय मान्य नसणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३.११ निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त पदे व अनुशेषाचा विचार करुन या परिमंडलाच्या कार्यक्षेत्रामधील मंडल कार्यालयाकडे नियुक्तीसाठी वर्ग करण्यात येईल. उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

१३.१२ विहित वयोमर्यादेतील व पात्र अशा शासकीय / निमशासकीय सेवेतील / शासकीय उपक्रमातील कर्मचा-यांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या संस्थेचे / कंपनीचे **ना हरकत प्रमाणपत्र** कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. मात्र त्यांच्या पूर्वीच्या संस्थेच्या /कंपनीच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

१३.१३ उमेदवाराने जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्सर चूकीची / खोटी माहिती अथवा कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केल्यास अथवा माहिती दडविली आहे असे आढळल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा त्यांचे पूर्वचारित्र्यात गैर असल्याचे आढळून आल्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि नियुक्ती दिली असल्यास कोणत्याही नोटीसीशिवाय किंवा कोणतेही कारण न देता बडतर्फ करण्याचा अधिकार कंपनीस राहील.

१३.१४ महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्याने भरती प्रक्रियेसाठी जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्सर चूकीची / खोटी माहिती अथवा कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केली असल्यास अथवा माहिती दडविली आहे असे आढळल्यास अशा कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

१३.१५ भरती प्रक्रियेत उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचा अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३.१६ निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत राहील. त्यानंतर ही निवड सूची कंपनीच्या नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१३.१७ जाहिरातीत किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः किंवा संपूर्ण बदल करण्याचे तसेच, जाहिरात अंशतः किंवा पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखुन ठेवित आहे. याबाबतचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविणे कंपनीस बंधनकारक नसेल.

१३.१८ जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

१३.१९ भरती प्रक्रिये संबंधीची माहिती वेळोवेळी कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावरील "Career & Job Opening" Page वर प्रसिध्द करण्यात येईल. संबंधीत उमेदवारांनी भरती प्रक्रियेसंबंधीच्या अद्ययावत माहितीसाठी कंपनीचे संकेतस्थळ वेळोवेळी पहावे.

१३.२० या जाहिरातीच्या अनुषंगाने निर्माण झालेला कोणताही विवाद हा **मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश औरंगाबाद** न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असेल.

दिनांकः- १६.०६.२०१७

मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल **औरंगाबाद**

**ऑनलाइन अर्ज सादर करण्याकरिता येथे Click करा**

## छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना

### छायाचित्र

१. उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र अपलोड करावे.
२. सदरचे छायाचित्र फीकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
३. कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅश वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. छायाचित्राचे Dimension २०० × २३० pixels एवढे असावे व त्याचा आकार २० kb ते ५० kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे ५० kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

### स्वाक्षरी :

१. उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करावी.
२. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.
३. अर्जासोबत अपलोड केलेली स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
४. स्वाक्षरीचा आकार १० kb ते २०kb व त्याचे Dimensions 140 ×160 pixels एवढे असावे. स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही २० kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

### छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पद्धत

१. छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे Resolution हे 200 डी. पी. आय. (Dots per inch) एवढे असावे.
२. कलर हा True colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.
३. उपरोक्त छायाचित्र व स्वाक्षरीबाबत दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG or JPEG format मध्ये असावी.
४. जर मुद्दा क्र. ३ नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रीनवर Error Message दिसेल.

### छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पद्धत

१. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी असलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.
२. उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पद्धत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.
३. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

*****